**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग**
शासन आदेश क्रमांक: एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१/नवि-१४
मंत्रालय (मुख्य इमारत), चौथा मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई-४०० ०३२
दिनांक: २९ डिसेंबर, २०२३.

**संदर्भ :-** १) सन २०२१ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.०१, दिनांक १३.०१.२०२१.
२) सन २०२१ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.०६, दिनांक २३.०३.२०२१.
३) राज्य निवडणूक आयोगाचे पत्र क्र.रानिआ/मनपा-२०२०/प्र.क्र.७/का.५, दिनांक १५.१२.२०२३.

**शासन आदेश :-**

राज्य निवडणूक आयोगाने मुदत संपत असलेल्या स्थानिक संस्थांच्या सार्वत्रिक निवडणूका विहीत वेळेत घेणे शक्य होणार नसल्याचे तसेच संबंधित नागरी स्थानिक संस्थांची मुदत संपताच तेथे प्रशासकांची नियुक्ती करण्याबाबत संदर्भ क्र.३ अन्वये शासनास कळविले आहे.

२. भारतीय संविधानातील अनुच्छेद २४३U तसेच, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ मधील कलम ६, ६(अ) मधील तरतुदीनुसार पालिकेची मुदत ही पहिल्या बैठकीपासून जास्तीत जास्त पाच वर्षांची असल्यामुळे सदर मुदत पुढे सुरू ठेवता येणार नाही.

३. त्यामुळे, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषतः कलम ४५२अ च्या (१अ) व (१ब) मधील तरतुदीनुसार दिनांक ३०.१२.२०२३ रोजी मुदत संपत असलेल्या **धुळे महानगरपालिका** येथे **प्रशासक पदी आयुक्त, धुळे महानगरपालिका** यांची नियुक्ती करण्यात येत आहे.

४. आयुक्त, धुळे महानगरपालिका यांनी महानगरपालिकेची विहीत मुदत संपल्यापासून प्रशासक म्हणून कार्यभार स्विकारावा तसेच अधिनियमातील तरतुदीनुसार आवश्यक कार्यवाही करावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**(प्रियांका कुलकर्णी-छापवाले)**
**शासनाच्या उप सचिव**

**प्रति,**

आयुक्त, धुळे महानगरपालिका.

**प्रतिलिपी,**

मा.मुख्यमंत्री महोदयांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
मा.उप मुख्यमंत्री महोदयांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव (नवि-१), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव (नवि-२), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
सचिव, राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र राज्य.
सर्व सह / उप सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
निवडनस्ती (नवि-१४).